**विनाअनुदान**
२७१९१०००२२६.
५६.०१.१७६

क्रमांक शिउसं/औ/उमावि-१/२०१८-१९/2048
विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,
भडकल गेटजवळ, औरंगाबाद.
दिनांक :- 15 APR 2021

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
स्व. सिंधू मेमोरिअल कनिष्ठ महाविद्यालय,
जाधववाडी औरंगाबाद

**विषय :- सन २०१९-२० शैक्षणिक वर्षात क.म.वि/उ.मा.वि शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे पदनिर्धारण.**

**संदर्भ :-** आपला प्रस्ताव क्र.२०२०-२१/--, दि. २७.११.२०२०.

सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात प्रवेशित विद्यार्थी संख्येच्या आधारावर आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात / उच्च माध्यमिक विद्यालयात मंजूर असलेल्या तुकडयांपैकी मान्य विषयानुसार खालीलप्रमाणे वर्ग / तुकडया सुरु ठेवण्यास परवानगी देयात येत आहे.

| वर्ष | प्रकार | इयत्ता ११ वी | | | | इयत्त १२ वी | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कला | विज्ञान | वाणिज्य | संयुक्त | कला | विज्ञान | वाणिज्य | संयुक्त | |
| २०१९-२० | विना अनुदानित | ०१ | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | २ |
| | विद्यार्थी संख्या | ४० | ४० | -- | -- | -- | -- | -- | -- | ८० |

१. शिक्षण उपसंचालक यांची पूर्व परवानगी घेतल्याशिवाय जादा वर्ग तुकडया / अतिरिक्त शाखेचे वर्ग सुरु करु नयेत.
२. प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त प्रवेश दिलेल्या कला, विज्ञान व वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांना मान्य करण्यात आलेल्या बॅचेसमध्ये सामावून घेण्यात यावे. क्षमतेपेक्षा अधिक प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांमुळे वाढणारा अतिरिक्त कार्यभार मान्य करण्यात येणार नाही.
३. शिल्लक कार्यभारावर नवीन शिक्षकांची नियुक्ती करण्यापूर्वी या कार्यालयाची जाहिरातीसाठी पूर्व परवानगी घेणे अवश्यक आहे. अन्यथा पूर्व परवानगी न घेता केलेल्या नियुक्तीस मान्यता देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.
४. स्वाध्यायासाठी मान्य करण्यात आलेल्या तासिका मान्य करण्यात आलेले संच मान्यता प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे अस्तीत्वात असाव्यात. प्रत्यक्षात मान्य करण्यात आलेल्या स्वाध्यायाच्या तासिका / कार्यभार अस्थित्वात नसल्यास तसेच सबंधित विषय शिक्षकांना या कार्यालयाने मान्य केलेला कार्यभार दिलेला नाही असे निदर्शनास आल्यास त्या विषयाच्या एकुण कार्यभारातून तेवढा कार्यभार कमी केला जाईल व सबंधित विषय शिक्षकाकडून धारण केलेल्या कार्यभाराच्या प्रमाणात पगाराची वसुली केली जाईल व यास मुख्याध्यापक /प्राचार्य स्वत: जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी. प्रत्येक विषय शिक्षकांना मंजुर केलेल्या कार्यभारातील स्वाध्यायाचा कार्यभार बरोबर घेतात किंवा कसे याच्या वेगळया नोंदी मुख्याध्यापक / प्राचार्यांनी स्वतंत्र नोंदवहीत ठेवावीत.
५. खालील कायम शिक्षकांना पुरेसा कार्यभार उपलब्ध नसल्यामुळे ते अतिरिक्त ठरतात त्यांना समायोजीत करण्यासाठी महाराष्ट्र खाजगी शाळा नियमावली १९८१ मधील नियम क्र. २६ प्रमाणे त्वरीत कार्यवाही करावी. नियमानुसार कार्यवाही न झाल्यास अतिरिक्त कर्मचाऱ्यांच्या वेतनाची संपूर्ण जबाबदारी व्यवस्थापनाची राहील.

**अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांची / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची माहिती**

| अ. क्र | शिक्षकंचे नांव | शैक्षणिक पात्रता/ व्या. पात्रता / पदव्युत्तर स्तरावरील विषय व श्रेणीसह | नियुक्तीची तारीख | सेवेत कायम झाल्याची तारीख | अतिरिक्त झाल्याचे वर्ष | शिकवित असलेले विषय | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |

यथानियम प्रविष्ठ विद्यार्थी संख्या व मान्य तुकडया विचारात घेवून खालीलप्रमाणे कार्यभार व पदे मान्य करण्यात येत आहेत.

ब ) विनाअनुदानित तुकडीवरील विषयनिहाय कार्यभार.

| अ. क्र. | विषय | विषयासाठी उपलब्ध विद्यार्थी संख्या | | प्रत्यक्षात आठवडयातील उपलब्ध एकुण तासिका | | घड्याळी तास | मान्य पदांची संख्या | | मान्यताप्राप्त शिक्षकांना शिकविण्यास दिलेला विषय क्रमांक | शिल्लक कार्यभार (तासिकेत ) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | इ. ११ वी | इ. १२ वी | | | | पुर्णवेळ | अर्धवेळ | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | इंग्रजी | ४० | -- | ०५ | १० | -- | -- | -- | -- | -- |
| २ | मराठी | ४० | -- | ०५ | | | | | | |
| ३ | इतिहास | ४० | -- | ०६ | १२ | ९ | -- | १ | -- | -- |
| ४ | राज्यशास्त्र | ४० | -- | ०६ | | | | | | |
| ५ | समाजशास्त्र | ४० | -- | ०६ | १२ | ९ | -- | १ | -- | -- |
| ६ | अर्थशास्त्र | ४० | -- | ०६ | | | | | | |
| ४ | भौतिकशास्त्र | ४० | -- | १५ | | ११.४५ | -- | १ | - | - |
| ५ | रसायनशास्त्र | ४० | -- | १५ | | ११.४५ | -- | १ | - | - |
| ६ | जीवशास्त्र | ४० | -- | १५ | | ११.४५ | -- | १ | - | - |
| ७ | गणित | ४० | -- | १० | | ७.३० | -- | -- | - | - |
| ८ | शा.शिक्षण | ४० | -- | ०२ | | १.३० | -- | -- | - | - |
| ९ | पर्यावरण | ४० | -- | ०२ | | १.३० | -- | -- | - | - |
| | | | | | | एकुण | - | ५ | | |

**मंजूर पदांचा तपशील :**

| वर्ष | उच्च माध्यमिक शिक्षक | | शिक्षकेत्तर कर्मचारी | | | | अतिरिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | पूर्णवेळ | अर्धवेळ | प्र.शा.स. | प्र.शा.प. | कनिष्ठ लिपिक | सेवक | |
| २०१८-१९ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| २०१९-२० | -- | ०५ | -- | -- | -- | -- | -- |

-

टिप:-१) शासन निर्णय दि.२६/०३/२००२ व शासन निर्णय, दि.१९/०७/२०१४ नुसार नव्याने एकुण निर्माण होणाऱ्या अनुदानित/विनाअनुदानित पदास शासनाची खात्याची मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यानुसार नव्याने निर्माण होणाऱ्या पदास शासनाची/खात्याची परवानगी असल्याशिवाय पद भरण्यात येवू नये.

२). प्रस्तावातील चुकीच्या माहितीमुळे अथवा इतर कारणाने संचमान्यता चुकीची असल्याचे आढळून आल्यास कोणत्याही क्षणी मान्यता रद्द होण्यास पात्र असेल.तसेच सदर प्रकरणी संबंधित प्राचार्य / मुख्याध्यापक हे कार्यवाहीस पात्र ठरतील, याची नोंद घ्यावी.

विभागीय शिक्षण उपसंचालक,
औरंगाबाद.

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव:

१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद .
२. अधिक्षक, वेतन व भ.नि.नि पथक (माध्यमिक), औरंगाबाद .
३. निवडनस्ती.